## नि.क्र. ५० वरील आदेश.

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ०१ ने आदेश ०६ नियम १७ दिवाणी प्रक्रीया संहिता अन्वये न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ चे असे कथन आहे की, वादीने त्याच्या वादपत्रात कथन केले की, जमीन गट क्र. ११/२ मधील एकूण क्षेत्र पोटखराब २ आर. सह २ हे. ०१ आर जमीनीपैकी कांही जमीनीवर प्रतिवादीने अतिक्रमण केलेले आहे. वास्तविक त्याबाबत कुठल्याच मोजणी अधिका-याचा अहवाल वादीने दाव्यात दाखल केलेला नाही.

२. वाद जमीन गट क्र. ११/२ क्षेत्र एकूण ०२ हे. ०१ आर व गट क्र. ११ क्षेत्र एकूण ०० हे. ४० आर जमीनीची संयुक्तीक मोजणी झाली तर वादी व प्रतिवादी यांचे कुठल्याच प्रकारचे नुकसान होणार नसल्यामुळे तसेच सदरचा अर्ज हा पुरावा एकत्रीत करण्यासाठी दिला नाही तर वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद कायमस्वरुपी मिटावा म्हणून तालुका भूमी निरीक्षक चाकूर यांना सदर गट क्र. ११/२ क्षेत्र ०० हे. ४० आर व गट क्र. ११/२ क्षेत्र २ हे. ०१ आर ची संयुक्त मोजणी करुन त्यांच्या हद्दी कायम करुन तसा अहवाल मे. न्यायालयात दाखल करण्याचा आणि सदर मोजणीचा खर्च वादी व प्रतिवादी यांनी संयुक्तपणे भरणा करण्याचा आदेश पारीत करण्याची विनंती केली.

३. याउलट, वादीच्या वकीलांनी नि.क्र. ५० वरील पाठीमागील पानावर म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज मंजूर करण्यास त्याची हरकत नसल्याचे सांगितले. परंतू संयुक्त मोजणी करण्यासाठी प्रतिवादीने तालुका निरीक्षक भुमी अभिलेख चाकूर यांची नेमणुक करण्यासाठी अर्ज दिलेला असलयाने त्याचा खर्च प्रतिवादीने करणे आवश्यक असल्याचे म्हटले. तसेच गट नं. ११/१ मधील व ११/२ मौजे तिवटघाळ मधील अनुक्रमे ४० आर व २ हे. १ आर पोट खराबसह जमीनीची मोजणीचे क्षेत्र कायम करुन दोन्ही जमीनीच्या सिमा निश्चीत करुन तसा मोजणी नकाशासह अहवाल कोर्टात दाखल करण्यास कोर्ट कमिशरनला आदेशीत करण्यात वादीची हरकत नसल्याचे म्हटले.

४. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. सदरचा अर्ज प्रतिवादीने दाखल केला असून वादीची सदर अर्जास कोणतीही हरकत नाही. केवळ वादीच्या वकीलांनी प्रतिवादीने संयुक्त मोजणीचा खर्च संपूर्णपणे करावा असे म्हणणे दाखल केले, परंतू युक्तीवादाच्या वेळी दाव्याचे स्वरुप आणि वादी आणि प्रतिवादी यांचा जमीनीवरील ताबा बघता संयुक्त मोजणीचा अर्धा खर्च

सोसण्यास तयार असल्याचे म्हटले. त्यामुळे दोन्ही पक्षांच्या विनंतीवरुन सदरचा अर्ज खालील अटी व शर्थीवर मंजूर करणे योग्य ठरेल. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**- आदेश-**

१. प्रतिवादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. तालुका भूमी निरीक्षक चाकूर यांना वाद जमीनीच्या मोजणीकरीता न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमण्यात येते.

३. दोन्ही पक्षांनी मोजणीचा खर्च अर्धा अर्धा वाटून घ्यावा.

४. दोन्ही पक्षांनी न्यायालयीन आयुक्तांना संयुक्त मोजणीकरीता योग्य ते दस्तऐवज पुरवावे.

५. न्यायालयीन आयुक्तांनी दोन्ही पंक्षकांराना नोटीस पाठवून वादी व प्रतिवादीच्या जागेची संयुक्त मोजणी करुन तसा सविस्तर अहवाल दोन महिन्यांत दाखल करावा.

( योगेश द. कोईनकर )

दि.११.१०.२०१९. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर चाकूर